# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## व्यवस्थापन परिषद बैठक- इतिवृत्त

(दि. ०७-०९-२०१९)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक दिनांक ०७-०९-२०१९ रोजी सकाळी ११:३० वाजता कुलगुरू प्राध्यापक डॉ. प्रमोद येवले यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ परिसरातील मुख्य प्रशासकीय इमारतीत व्यवस्थापन परिषद कक्षात संपन्न झाली.

सदरील बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.:-

| | | |
|---|---|---|
| १. | मा. प्रा. (डॉ.) प्रमोद येवले- कुलगुरु (अध्यक्ष) | |
| २. | मा. डॉ. प्रवीण वक्ते- प्र-कुलगुरू | |
| ३. | मा. श्री. किशोर शितोळे- मा.कुलपतींद्वारे नामनिर्देशित सदस्य | |
| ४. | डॉ. भालचंद्र वायकर- अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान | |
| ५. | डॉ. मुरलीधर लोखंडे- अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन | |
| ६. | डॉ. अशोक देशमाने- विभागप्रमुख | |
| ७. | मा. डॉ. हरिदास गोपीनाथ विधाते, प्राचार्य | |
| ८. | मा. डॉ. जयसिंग श्रीराम देशमुख, प्राचार्य | |
| ९. | मा. डॉ. फुलचंद भगीरथ सलामपुरे, अध्यापक (अधिसभा) | |
| १०. | मा. डॉ. राजाभाऊ नारायणराव करपे, अध्यापक (अधिसभा) | |
| ११. | मा. श्री. राहूल जनार्धन म्हस्के, व्यवस्थापन प्रतिनिधी (अधिसभा) | |
| १२. | मा. श्री. संजय प्रकाश निंबाळकर, व्यवस्थापन प्रतिनिधी (अधिसभा) | |
| १३. | मा. श्री. सुनिल पुंडलिकराव निकम, नोंदणीकृत पदवीधर (अधिसभा) | |
| १४. | मा. डॉ. नरेंद्र हिरालाल काळे, नोंदणीकृत पदवीधर (अधिसभा) | रजा मंजूर केली |
| १५. | *अध्यापक (विद्यापरिषद)* | *रिक्त* |
| १६. | मा. डॉ. सय्यद शर्फुन निहार सय्यद अन्वर अली, अध्यापक (विद्यापरिषद) | |
| १७. | मा. डॉ. टी. जी. सीताराम, कुलगुरूद्वारे कुलपतींशी विचारविनिमयाद्वारे नामनिर्देशित | अनुपस्थित |
| १८. | मा. सचिव, उच्च शिक्षण किंवा त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती | अनुपस्थित |
| १९. | मा. डॉ. सतीश देशपांडे, सहसंचालक, उच्च शिक्षण | अनुपस्थित |
| २०. | मा. डॉ. एम. डी. शिवणकर, सहसंचालक, तंत्र शिक्षण | अनुपस्थित |
| २१. | मा. श्री. दिलीप भरड- प्र. कुलसचिव (सदस्य सचिव) | |
| | **निमंत्रित सदस्य** | |
| २२. | मा. श्री. राजेंद्र मडके, वित्त व लेखा अधिकारी | |
| २३. | मा. डॉ. गणेश मंझा- संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | |

बैठकीच्या सुरुवातीला कुलसचिवांनी सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. तद्नंतर बैठकीच्या कामकाजाला सुरुवात झाली.

| | |
|---|---|
| १ | (१) दि. ०९-०८-२०१९ (तातडीची बैठक) आणि (२) दि. १६-०८-२०१९ (तातडीची बैठक) रोजी संपन्न झालेल्या तातडीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीचा कार्यवृत्तांत संमत करणेबाबत. |
| | **ठराव**<br>**(१) दि. ०९-०८-२०१९ (तातडीची बैठक) आणि (२) दि. १६-०८-२०१९ (तातडीची बैठक) रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषद बैठकीचा कार्यवृत्तांत संमत करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| २ | (१) दि. ११-०२-२०१९ व संस्थगित बैठका दि. ०८-०३-२०१९ व २५-०७-२०१९ (२) दि. ०९-०८-२०१९ (तातडीची बैठक) आणि (३) दि. १६-०८-२०१९ (तातडीची बैठक) रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीच्या कार्यवृत्तांतावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संमत करणेबाबत. |
| | **ठराव**<br>**(१) दि. ११-०२-२०१९ व संस्थगित बैठका दि. ०८-०३-२०१९ व २५-०७-२०१९ (२) दि. ०९-०८-२०१९ (तातडीची बैठक) आणि (३) दि. १६-०८-२०१९ (तातडीची बैठक) रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीच्या कार्यवृत्तांतावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील दुरुस्तीसह मान्य करावा, असे सर्वानुमते ठरले.**<br>**<u>दुरुस्ती</u>:- दि. ०९-०८-२०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमधील ठराव क्र. ३ मध्ये शैक्षणिक सत्र २०१९-२० ऐवजी २०२०-२१ अशी दुरुस्ती करण्यात यावी.** |
| ३ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७० (३)(ग) नुसार व्यवस्थापन परिषदेद्वारे एक अधिष्ठाता स्थायी समितीवर नामनिर्देशित करण्याबाबत. |
| | **ठराव**<br>**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७० (३)(ग) नुसार व्यवस्थापन परिषदेद्वारे डॉ. मुरलीधर लोखंडे, अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांना स्थायी समितीवर नामनिर्देशित करण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले.** |
| ४ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७० (३)(घ) नुसार व्यवस्थापन परिषदेद्वारे त्या परिषदेच्या निर्वाचित सदस्यांमधून एक सदस्य स्थायी समितीवर नामनिर्देशित करण्याबाबत. |
| | **ठराव**<br>**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७० (३)(घ) नुसार व्यवस्थापन परिषदेद्वारे त्या परिषदेच्या निर्वाचित सदस्यांमधून श्री. राहूल म्हस्के यांना स्थायी समितीवर नामनिर्देशित करण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले.** |
| ५ | अधिष्ठाता पदाच्या निवड समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेच्या एका सदस्याचे नामनिर्देशन करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**अधिष्ठाता पदाच्या निवड समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून १) डॉ. शर्फुन निहार आणि २) डॉ. जयसिंग देशमुख यांचे नाव सुचविण्यात आले. त्यापैकी डॉ. शर्फुन निहार यांचे मतदानाद्वारे नामनिर्देशन करण्यात आले.** |
| ६ | विद्यापीठ उप-परिसर संचालक पदाच्या निवड समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेच्या एका सदस्याचे नामनिर्देशन करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापीठ उप-परिसर संचालक पदाच्या निवड समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून १) डॉ. एच. जी. विधाते आणि २) डॉ. आर. एन. करपे यांचे नाव सुचविण्यात आले. त्यापैकी डॉ. हरिदास विधाते यांचे मतदानाद्वारे नामनिर्देशन करण्यात आले.** |

| | |
|---|---|
| ७ | ५९ व्या दीक्षांत समारंभ प्रसंगी मार्च/ एप्रिल २०१८ परीक्षेत उत्तीर्ण सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या तसेच एम.फिल. व पीएच.डी. पदवीस पात्र स्नातकांना उपस्थित तथा अनुपस्थितीत त्या-त्या पदव्यांचा अनुग्रह करण्यासंबंधी प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**५९ व्या दीक्षांत समारंभ प्रसंगी मार्च/ एप्रिल २०१८ परीक्षेत उत्तीर्ण सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या तसेच एम.फिल. व पीएच.डी. पदवीस पात्र स्नातकांना उपस्थित तथा अनुपस्थितीत त्या-त्या पदव्यांचा अनुग्रह करण्यासंबंधी प्रस्ताव मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |

| अ.क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | पीएच.डी. | ३७० |
| २ | एम.फिल. | ३५ |
| ३ | पदव्युत्तर पदवी | ८,९५४ |
| ४ | पदवी | ३४,०२९ |
| ५ | डिप्लोमा | ४१५ |
| ६ | सर्टिफिकेट | ५८ |
| | एकूण | ४३,८६१ |

| | |
|---|---|
| ८ | विद्यापीठाचे मुख्य सभागृह (नाट्यगृह) भाडे तत्त्वावर देण्यासंदर्भात नियमावली निश्चित करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेस विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापीठाचे मुख्य सभागृह (नाट्यगृह) भाडे तत्त्वावर देण्यासंदर्भात नियमावली निश्चित करण्यासाठीचे सर्वाधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात यावेत, असे सर्वानुमते ठरले.** |
| ९ | विद्यापीठाचे अतिथिगृह देण्यासंदर्भात नियमावली विस्तृत करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेस विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यापीठाच्या अतिथिगृहासंदर्भात श्री. संजय निंबाळकर, व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली गठीत याआधी गठीत करण्यात आलेल्या समितीने यासंदर्भात आपला अहवाल व्यवस्थापन परिषदेस सादर करावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| १० | मा. व्यवस्थापन परिषदेने दि. १६-०८-२०१८ रोजी गठीत केलेल्या सर्व अध्यासन केंद्राच्या आढावा घेण्यासंदर्भात डॉ. राजेश करपे यांच्या अध्यक्षतेखालील दि. ३०-०१-२०१९ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत अवलोकनार्थ व आदेशास्तव सादर. |
| | **ठराव**<br>**आद्यकवी मुकुंदराज अध्यासन केंद्र हे अंबाजोगाई या ठिकाणाऐवजी विद्यापीठ परिसरात सुरू करण्यात यावे, या दुरुस्तीसह डॉ. राजेश करपे यांच्या अध्यक्षतेखालील दि. ३०-०१-२०१९ रोजी झालेल्या अध्यासन केंद्राच्या आढावा बैठकीचा कार्यवृत्तांत मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| ११ | इमारती व बांधकाम समितीने दिनांक १३-०३-२०१९ रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारशीवर विचार करणेबाबत. |

| | |
|---|---|
| | **ठराव**<br>**मे. अभिषेक कन्स्ट्रक्शन यांनी कामासाठी वाळू न वापरता डस्ट वापरली, सबब, त्यांचे देयक अदा करू नये असे व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. संजय निंबाळकर ह्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच यासंदर्भात योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी असे सुचविले. तेव्हा दुरुस्तीसह इमारती व बांधकाम समितीने दिनांक १३-०३-२०१९ रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारशी मान्य करण्यात याव्यात, असे सर्वानुमते ठरले.** |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त दि. १५/०४/२०१९ ते दि. १७/०४/२०१९ या दरम्यानच्या कार्यक्रमाबाबत. |
| | **ठराव**<br>**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त दि. १५-०४-२०१९ ते दि. १७-०४-२०१९ या दरम्यानच्या कार्यक्रमासाठी झालेल्या खर्चास मान्यता देण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.**<br>**तसेच विद्यापीठात कोणत्याही प्रकारचे कार्यक्रम आयोजित करावयाचे असतील तर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या माहितीसह प्रस्ताव मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात यावा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतरच कार्यक्रम आयोजित करण्यात यावा, असेही सर्वानुमते ठरले.** |
| १३ | विद्यापीठ निवासस्थान व वसतीगृह समितीची दिनांक ०३-०८-२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त सादर करणेबाबत. |
| | **ठराव**<br>**इतिवृत्तातील क्र. २९ तत्वतः मान्य करण्यात यावे, वित्त व लेखाधिकारी आणि कार्यकारी अभियंता यांनी निवासस्थान दरासंदर्भात शिफारस करावी, या दुरुस्तीसह विद्यापीठ निवासस्थान व वसतीगृह समितीचे दि.०३-०८-२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त मान्य करण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले.** |
| १४ | विद्यापीठ परिसरात कास्ट्राईब कर्मचारी संघटनेच्या कार्यालयासाठी जागा व नामफलकासाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत. |
| | **ठराव**<br>**विद्यापीठ परिसरात कास्ट्राईब कर्मचारी संघटनेच्या कार्यालयासाठी जागा व नामफलकासाठी जागा उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| १५ | विद्यापीठ परिसरातील समाजकार्य महाविद्यालयाचा दर्जा निश्चित करण्याबाबत. |
| | **ठराव**<br>**विद्यापीठ परिसरातील समाजकार्य महाविद्यालयाचा दर्जा Conducted College असा असेल, असे सर्वानुमते ठरले.** |
| १६ | गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थेच्या नियामक मंडळाने संस्थेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत घेतलेल्या बैठकांचे कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थेच्या नियामक मंडळाने संस्थेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत घेतलेल्या बैठकांचे कार्यवृत्तांत अवलोकन करण्यात आले. यासंदर्भात मा. कुलगुरूंनी आढावा घ्यावा, असे सर्वानुमते ठरले.** |

| | |
|---|---|
| १७ | गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेकरिता ०२ सहाय्यक प्राध्यापक व ०२ ॲडजेंट प्राध्यापकांची नियुक्ती तसेच वेतनात वाढ करणेबाबत. |
| | **ठराव**<br>**गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेमध्ये प्राध्यापक नियुक्तीकरिता कायद्यातील तरतुदीनुसार प्रक्रिया करण्यात यावी. यासंदर्भात आढावा घेऊन कार्यवाही करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात यावेत, असे सर्वानुमते ठरले.** |
| १८ | गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेकरिता समन्वयकाची नियुक्ती करणेबाबत. |
| | **ठराव**<br>**गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेकरिता समन्वयकाची नियुक्तीकरिता शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात यावेत, असे सर्वानुमते ठरले.** |
| १९ | विद्यापीठ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतनासाठी अवेतनीय खात्यामधून वेतनीय खात्यात रक्कम वर्ग केल्याच्या कार्यवाहीस तसेच वेतन अनुदान प्राप्त झाल्यानंतर वेतनीय खात्यामधून अवेतनीय खात्यात रक्कम वर्ग केल्याच्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबत. |
| | **ठराव**<br>**विद्यापीठ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतनासाठी अवेतनीय खात्यामधून वेतनीय खात्यात रक्कम वर्ग केल्याच्या कार्यवाहीस तसेच वेतन अनुदान प्राप्त झाल्यानंतर वेतनीय खात्यामधून अवेतनीय खात्यात रक्कम वर्ग केल्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| २० | मा. कुलगुरु यांनी त्यांना प्राप्त असलेला विशेष अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ कलम १२ (७) व्यवस्थापन परिषदेच्या वतीने विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतंर्गत एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेसंबंधीचा सुधारीत अध्यादेश क्रं. ९८६ शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून लागू करण्याकरिता मान्यता देवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**मा. कुलगुरु यांनी त्यांना प्राप्त असलेला विशेष अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम- २०१६ कलम १२ (७) व्यवस्थापन परिषदेच्या वतीने विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतंर्गत एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेसंबंधीचा सुधारीत अध्यादेश क्रं. ९८६ शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून लागू करण्याकरिता मान्यता देवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| २१ | नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ इलेक्ट्रानिक्स ॲण्ड इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी (NIELIT), विद्यापीठ परिसर येथे पी.जी. डिप्लोमा इन इंटरनेट ऑफ थिंग्स (Internet of Things) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू केलेला असल्यामुळे सदरील पदविका परिनियम-२८८ मध्ये समाविष्ट करुन परिनियम-१३३ मध्ये Internet of Things या विषयाचा समावेश करण्यासाठी अधिष्ठता, विज्ञान व तंत्रज्ञान यांनी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. |

| | |
|---|---|
| | **ठराव**<br>**नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी (NIELIT), विद्यापीठ परिसर येथे पी.जी. डिप्लोमा इन इंटरनेट ऑफ थिंग्स (Internet of Things) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू केलेला असल्यामुळे सदरील पदविका परिनियम-२८८ मध्ये समाविष्ट करुन परिनियम-१३३ मध्ये Internet of Things या विषयाचा समावेश करण्यासाठी अधिष्ठता, विज्ञान व तंत्रज्ञान यांनी केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| २२ | विद्यापरिषदेने दि. २९-१२-२०१८ रोजी झालेल्या बैठकीत शिफारस केलेल्या LL.B. [Three Year Degree Course] तसेच LL.B. Integrated Double Degree Course leading to B.A. LL.B. (Five Year LL.B. Double Degree Integrated Programme) अभ्यासक्रमाचे अध्यादेश व नियामकांना मान्यता देण्याबाबत प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापरिषदेने दि. २९-१२-२०१८ रोजी झालेल्या बैठकीत शिफारस केलेल्या LL.B. [Three Year Degree Course] तसेच LL.B. Integrated Double Degree Course leading to B.A. LL.B. (Five Year LL.B. Double Degree Integrated Programme) अभ्यासक्रमाचे अध्यादेश व नियामकांना मान्यता देण्याबाबत प्रस्ताव मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| २३ | विद्यापरिषदेने दि. २९-१२-२०१८ रोजी झालेल्या बैठकीत शिफारस केलेल्या गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश घेण्यासंबंधीच्या अध्यादेश व सदरील विषय 1. Socio-cultural and Political Aspects, 2. Rural Economics, Banking & Industry समावेश परिनियम- १३३ व Master of Rural Studies (M.R.S.) या पदव्युत्तर पदवीचा समावेश परिनियम- २२८ मध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापरिषदेने दि. २९-१२-२०१८ रोजी झालेल्या बैठकीत शिफारस केलेल्या गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश घेण्यासंबंधीच्या अध्यादेश व सदरील विषय 1. Socio-cultural and Political Aspects, 2. Rural Economics, Banking & Industry समावेश परिनियम- १३३ व Master of Rural Studies (M.R.S.) या पदव्युत्तर पदवीचा समावेश परिनियम- २२८ मध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| २४ | दिनांक २९-१२-२०१८ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत बी.कॉम. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंबंधीचा नियामक क्र. २००४ शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून रद्द करण्याबाबत मान्यता देऊन केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**दिनांक २९-१२-२०१८ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत बी.कॉम. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंबंधीचा नियामक क्र. २००४ शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून रद्द करण्याबाबत मान्यता देऊन केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |

| | |
|---|---|
| २५ | दिनांक २९-१२-२०१८ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत संचालक, व्यवस्थापनशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी शिफारस केलेला BCA-MCA Integrated Degree Programme हा अभ्यासक्रम आणि सदरील अभ्यासक्रमाचा अध्यादेश, नियामके आणि शैक्षणिक शुल्क यास शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून लागू करण्याबाबत मान्यता देऊन केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**दिनांक २९-१२-२०१८ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत संचालक, व्यवस्थापनशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी शिफारस केलेला BCA-MCA Integrated Degree Programme हा अभ्यासक्रम आणि सदरील अभ्यासक्रमाचा अध्यादेश, नियामके आणि शैक्षणिक शुल्क यास शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून लागू करण्याबाबत मान्यता देऊन केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| २६ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यास महाराष्ट्र शासनाने स्वायत्तता दिलेली असून विद्यापीठ अनुदान आयोगानेही स्वायत्ततेस मान्यता दिलेली आहे. या महाविद्यालयास त्यांचे अभ्यासक्रम स्वतंत्रपणे करणे आणि अभ्यासक्रमाच्या पदव्यांचे नामाभिदान अभ्यासक्रमानुसार बदलण्याची स्वायत्तता असल्यामुळे बी.ई. या पदवीचे बी.टेक. आणि एम.ई या पदव्युत्तर पदवीचे एम.टेक. असे खालीलप्रमाणे नामाभिदान केलेले आहे. वरील विषय नव्याने सुरु केलेले असल्यामुळे या अभ्यासक्रमास मान्यता देवून परिनियम- १३३ मध्ये या विषयांचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यास महाराष्ट्र शासनाने स्वायत्तता दिलेली असून विद्यापीठ अनुदान आयोगानेही स्वायत्ततेस मान्यता दिलेली आहे. या महाविद्यालयास त्यांचे अभ्यासक्रम स्वतंत्रपणे करणे आणि अभ्यासक्रमाच्या पदव्यांचे नामाभिदान अभ्यासक्रमानुसार बदलण्याची स्वायत्तता असल्यामुळे बी.ई. या पदवीचे बी.टेक. आणि एम.ई या पदव्युत्तर पदवीचे एम.टेक. असे खालीलप्रमाणे नामाभिदान केलेले आहे. वरील विषय नव्याने सुरु केलेले असल्यामुळे या अभ्यासक्रमास मान्यता देवून परिनियम- १३३ मध्ये या विषयांचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| २७ | विद्यापरिषदेने दि. २९-१२-२०१८ रोजी झालेल्या बैठकीत शिफारस केलेल्या हिंदी विभागामध्ये Anuvad Diploma या अभ्यासक्रमास पूर्वलक्षी प्रभावाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश घेण्याबाबतचा अध्यादेश, परीक्षा व इतर संबंधीचे नियामके तसेच सदरील विषयाचा व पदवीकाचा समावेश परिनियम- १३३ व २२८ मध्ये समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापरिषदेने दि. २९-१२-२०१८ रोजी झालेल्या बैठकीत शिफारस केलेल्या हिंदी विभागामध्ये** Anuvad Diploma **या अभ्यासक्रमास पूर्वलक्षी प्रभावाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश घेण्याबाबतचा अध्यादेश, परीक्षा व इतर संबंधीचे नियामके तसेच सदरील विषयाचा व पदवीकाचा समावेश परिनियम- १३३ व २२८ मध्ये समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |

| | |
|---|---|
| २८ | विद्यापरिषदेने दि. २९-१२-२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे NSQF अंतर्गत संलग्नित महाविद्यालयांना वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या विषयाला परिनियम- १३३ मध्ये अनुक्रमे ५९ ते ६७ विषयांचा परिनियम- २२८ मध्ये अनुक्रमे ६४ ते ६७ वर खालीलप्रमाणे दर्शविलेल्या सर्टिफिकेट, पदविका, ॲडव्हान्स पदविका आणि पदवी यांचा समावेश करण्याकरिता मान्यता देऊन केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापरिषदेने दि. २९-१२-२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे NSQF अंतर्गत संलग्नित महाविद्यालयांना वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या विषयाला परिनियम- १३३ मध्ये अनुक्रमे ५९ ते ६७ विषयांचा परिनियम- २२८ मध्ये अनुक्रमे ६४ ते ६७ वर खालीलप्रमाणे दर्शविलेल्या सर्टिफिकेट, पदविका, ॲडव्हान्स पदविका आणि पदवी यांचा समावेश करण्याकरिता मान्यता देऊन केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| २९ | दिनांक २९-१२-२०१८ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत Choice Based Credit & Grading System प्रणालीमध्ये सुधारित बी.सी.ए., बी.बी.ए. आणि बी.कॉम. या अभ्यासक्रमासंबंधीचे सुधारित अध्यादेश व नियामके दि. २०-०८-२०१८ Order No. SU/Com. & Mgt./U.G. Level/ CBC & GS/ 2018/18613-18873 शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू करण्याबाबत मान्यता देऊन केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**दिनांक २९-१२-२०१८ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत Choice Based Credit & Grading System प्रणालीमध्ये सुधारित बी.सी.ए., बी.बी.ए. आणि बी.कॉम. या अभ्यासक्रमासंबंधीचे सुधारित अध्यादेश व नियामके दि. २०-०८-२०१८ Order No. SU/Com. & Mgt./U.G. Level/ CBC & GS/ २०१८/१८६१३-१८८७३ शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू करण्याबाबत मान्यता देऊन केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| ३० | दिनांक ०२-०२-२०१९ रोजी झालेल्या शुल्क निश्चिती समितीने M.Sc. Biotechnology चे रुपये २६६८५/- आणि M.Sc. Bioinformatics चे रुपये २५,६८५/- असलेले शैक्षणिक शुल्क १०% वाढ करून देताना रुपये ५ किंवा त्यापेक्षा कमी रक्कम आल्यास त्याच्या अगोदरचा दशम अंक घ्यावा आणि रुपये सहा किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास पुढील दशम अंक घेऊन त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्कामध्ये वाढ करण्याकरिता प्रस्ताव क्र. ६ अन्वये केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**दिनांक ०२-०२-२०१९ रोजी झालेल्या शुल्क निश्चिती समितीने M.Sc. Biotechnology चे रुपये २६६८५/- आणि M.Sc. Bioinformatics चे रुपये २५,६८५/- असलेले शैक्षणिक शुल्क १०% वाढ करून देताना रुपये ५ किंवा त्यापेक्षा कमी रक्कम आल्यास त्याच्या अगोदरचा दशम अंक घ्यावा आणि रुपये सहा किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास पुढील दशम अंक घेऊन त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्कामध्ये वाढ करण्याकरिता प्रस्ताव क्र. ६ अन्वये केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |

| | |
|---|---|
| ३१ | मा. कुलगुरू महोदय यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) व १२(८) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या विशेष अधिकारात B.Sc. Forensic Science & Cyber Security या नवीन अभ्यासक्रमाचे शैक्षणिक व इतर शुल्क रु. ३७,०००/- आणि प्रयोगशाळा शुल्क रुपये ८०००/- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू करण्यासाठी आदेश क्रमांक Order No. SU/Sci. & Tech./Ord./05/2019 dated 29-01-2019 अन्वये निर्गमित केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**मा. कुलगुरू महोदय यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) व १२(८) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या विशेष अधिकारात B.Sc. Forensic Science & Cyber Security या नवीन अभ्यासक्रमाचे शैक्षणिक व इतर शुल्क रु. ३७,०००/- आणि प्रयोगशाळा शुल्क रुपये ८०००/- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू करण्यासाठी आदेश क्रमांक Order No. SU/Sci. & Tech./Ord./05/2019 dated 29-01-2019 अन्वये निर्गमित केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शुल्क निश्चिती समितीकडे पुनर्विचारार्थ पाठविण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| ३२ | दिनांक ०२-०२-२०१९ रोजी झालेल्या शुल्क निश्चिती समितीने Diploma in T.V. Production & Basic in Film Making या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क रु. ३०,०००/- ऐवजी रुपये १०,०००/- प्रतीवर्ष करण्यासाठी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**दिनांक ०२-०२-२०१९ रोजी झालेल्या शुल्क निश्चिती समितीने Diploma in T.V. Production & Basic in Film Making या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क रु. ३०,०००/- ऐवजी रुपये १०,०००/- प्रतीवर्ष करण्यासाठी केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| ३३ | दिनांक ०२-०२-२०१९ रोजी झालेल्या शुल्क निश्चिती समितीने बी.ए.एम.सी.जे या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क रुपये ४,०००/- ऐवजी रुपये १०,०००/- प्रती वर्ष करण्यासाठी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**दिनांक ०२-०२-२०१९ रोजी झालेल्या शुल्क निश्चिती समितीने बी.ए.एम.सी.जे या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क रुपये ४,०००/- ऐवजी रुपये १०,०००/- प्रती वर्ष करण्यासाठी केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| ३४ | दिनांक ०२-०२-२०१९ रोजी झालेल्या शुल्क निश्चिती समितीने B.A. Dance या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क रु. २०,०००/- ऐवजी रुपये ५,०००/- प्रतीवर्ष करण्यासाठी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**दिनांक ०२-०२-२०१९ रोजी झालेल्या शुल्क निश्चिती समितीने B.A. Dance या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क रु. २०,०००/- ऐवजी रुपये ५,०००/- प्रतीवर्ष करण्यासाठी केलेली शिफारस मान्य करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| ३५ | विद्यापीठीय/ संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांना शासन निर्णय दि. ०८-०३-२०१९ नुसार सातवा वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करणेबाबत. |

| | |
|---|---|
| | **ठराव**<br>**विद्यापीठीय/ संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांना शासन निर्णय दि. ०८-०३-२०१९ नुसार सातवा वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करणेबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| ३६ | उपपरिसर, उस्मानाबाद येथील विद्यापीठ निधीतून विविध विभागात कार्यरत असलेल्या शिक्षकांना ७व्या वेतन आयोगाचे सर्व फायदे मिळणेबाबत. |
| | **ठराव**<br>**उपपरिसर, उस्मानाबाद येथील विद्यापीठ निधीतून विविध विभागात कार्यरत असलेल्या शिक्षकांना ७व्या वेतन आयोगाचे सर्व फायदे मिळणेबाबतचा प्रस्ताव तत्त्वतः मान्य करण्यात यावा. यासंदर्भात शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| ३७ | मा.कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशान्वये विद्यापीठातील कंत्राटदारामार्फत कार्यरत रोजंदारी कर्मचारी यांचे दि. ३०.०७.२०१९ रोजीचे निवेदन व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**मा.कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशान्वये विद्यापीठातील कंत्राटदारामार्फत कार्यरत रोजंदारी कर्मचारी यांचे दि. ३०.०७.२०१९ रोजीचे निवेदन अवलोकन करण्यात आले. प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे महागाई भत्ता अदा करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.**<br>**विद्यापीठात कार्यरत सर्व कंत्राटी कामगारांची बायोमेट्रिक हजेरी नोंदविण्यात यावी. बायोमेट्रिक हजेरीनुसारच कंत्राटी कामगारांचे वेतन अदा करण्यात यावे, असेही सर्वानुमते ठरले.**<br>**ज्या कंत्राटी कामगाराने काम सोडून त्याची पीएफची रक्कम काढली असेल किंवा विद्यापीठातील काम सोडून निघून गेला असेल, अशा कामगारांना पुन्हा विद्यापीठात कंत्राटी तत्त्वावर कामावर घेऊ नये, असेही सर्वानुमते ठरले.** |
| ३८ | मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशान्वये विद्यापीठातील मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर कायम नियुक्ती शासन मान्यता मिळेपर्यंत कंत्राटदारामार्फत कामावर घेण्याबाबतचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापीठातील मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर कायम स्वरुपात नियुक्ती मिळण्याबाबतचे प्रस्ताव त्वरित शासनाकडे पाठवून त्याचा शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| ३९ | उप परिसर उस्मानाबाद येथील महत्वाचे विषय मा. व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यासाठी श्री. संजय निंबाळकर मा. व्यवस्थापन परिषद सदस्य यांनी दिलेल्या पत्राबाबत. |
| | **ठराव**<br>**उप परिसर उस्मानाबाद येथील महत्वाचे विषय मा. व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यासाठी श्री. संजय निंबाळकर मा. व्यवस्थापन परिषद सदस्य यांनी दिलेल्या पत्राचे अवलोकन करण्यात आले. उपपरिसर उस्मानाबाद येथे sports activity वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, असे सर्वानुमते ठरले.** |

| | |
|---|---|
| ४० | १. डॉ. एस. जी. मिश्रा, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग २. डॉ. जी. एम. धरणे, प्राध्यापक, भौतिकशास्त्र विभाग ३. श्री. विकास कुमार, विभागप्रमुख, परकीय भाषा ४. डॉ. प्रभाकर उंदरे, प्राध्यापक, भौतिकशास्त्र विभाग ५. डॉ. किर्तीवंत घडेले, प्राध्यापक, गणित विभाग ६. डॉ. व्ही. के. हिवराळे, प्राध्यापक व विभागप्रमुख, बायोकेमिस्ट्री यांचे विदेश दौऱ्यासाठीचे प्रस्ताव तसेच विदेश दौऱ्यासाठी येणाऱ्या प्रस्तावांवर कार्यवाही सुरळीत करणेसंदर्भात नियमावली तयार करण्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चर्चा करण्यात आली. ज्या प्राध्यापकांना विदेश दौऱ्यासाठी External funding मिळत असेल त्या प्राध्यापकांनाच विदेश दौऱ्यासाठी मान्यता देण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. ह्यासंदर्भात राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय संमेलनासाठी विद्यापीठ निधीमधून देण्यात येणारे अनुदान त्वरित बंद करण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले.** |
| ४१ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११७ पोटकलम (२)(ग) अन्वये विद्याविषयक लेखा परिक्षा करिता समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेमध्ये नियुक्त एक तज्ज्ञ यांच्या नियुक्ती / नामनिर्देशनास्तव प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११७ पोटकलम (२)(ग) अन्वये विद्याविषयक लेखा परिक्षा करिता समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेमध्ये नियुक्त एक तज्ज्ञ यांच्या नियुक्ती/ नामनिर्देशनास्तव कार्यवाही करण्याचे सर्वाधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात यावेत, असे सर्वानुमते ठरले.** |
| ४२ | श्री. संजय निंबाळकर यांनी प्रस्तुत प्रत्राद्वारे प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नीकरण फिसबाबत व महाराष्ट्रातील इतर विद्यापीठातील संलग्नीकरण फिसबाबत निर्णय घेण्याची आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्या अनुषंगाने मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नीकरण फिसबाबत व महाराष्ट्रातील इतर विद्यापीठातील संलग्नीकरण फिसबाबत निर्णय घेण्यासंदर्भात खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.**<br>**१) श्री. संजय निंबाळकर- अध्यक्ष**<br>**२) डॉ. हरिदास विधाते- सदस्य** 3) डॉ. राजेश करपे. सदस्य.<br>**३) वित्त व लेखा अधिकारी- सदस्य सचिव**<br>**सदरील समितीने आपला अहवाल व्यवस्थापन परिषदेस सादर करावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| ४३ | मा. कुलगुरू यांनी त्यांना प्राप्त असलेला विशेष अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने विद्यापीठाने पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास लागू केलेल्या Compulsory Computer Course या अभ्यासक्रमातून राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स एवं सूचना प्रौद्योगिक संस्थान (NIELIT), विद्यापीठ परिसर येथे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत सुरू असलेल्या Course on Computer Concepts (CCC) या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुट देण्याकरिता मान्यता देऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. |

| | |
|---|---|
| | **ठराव**<br>**मा. कुलगुरू यांनी त्यांना प्राप्त असलेला विशेष अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम- २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने विद्यापीठाने पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास लागू केलेल्या Compulsory Computer Course या अभ्यासक्रमातून राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स एवं सूचना प्रौद्योगिक संस्थान (NIELIT), विद्यापीठ परिसर येथे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत सुरू असलेल्या Course on Computer Concepts (CCC) या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुट देण्याकरिता मान्यता देऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| ४४ | मा. कुलगुरू यांनी त्यांना प्राप्त असलेला विशेष अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम- २०१६ कलम १२ (८) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स एवं सूचना प्रौद्योगिक संस्थान (NIELIT), विद्यापीठ परिसर येथे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत सुरू करण्यात आलेला बी.टेक. इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम इंजिनियरींग हा नवीन अभ्यासक्रम परिनियम- १३३ मध्ये समावेश करण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारशीस मान्यता देऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**मा. कुलगुरू यांनी त्यांना प्राप्त असलेला विशेष अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम- २०१६ कलम १२ (८) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स एवं सूचना प्रौद्योगिक संस्थान (NIELIT), विद्यापीठ परिसर येथे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत सुरू करण्यात आलेला बी.टेक. इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम इंजिनियरींग हा नवीन अभ्यासक्रम परिनियम- १३३ मध्ये समावेश करण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारशीस मान्यता देऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| ४५ | विद्यापीठामध्ये स्थायी अधिवक्ता आणि विधिज्ञ नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापीठामध्ये स्थायी अधिवक्ता आणि विधिज्ञ नेमणूक करण्याबाबतचा सादर केलेला प्रस्तुत प्रस्ताव मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.**<br>**श्री. किशोर नाडे, लीगल असिस्टंट यांना फक्त रु. २४,०००/- दरमहा एकत्रित वेतन देण्यात यावे. त्यांना प्रभारी विधी अधिकारी पदाचे काम सांभाळण्याबाबत सध्या देण्यात येत असलेले रु. २५,०००/- दरमहा मानधन बंद करण्यात यावे, असेही सर्वानुमते ठरले.** |
| ४६ | विद्यापीठाच्या विविध विभागामध्ये Adjunct Faculty नियुक्त करणेबाबत धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापीठाच्या विविध विभागामध्ये Adjunct Faculty नियुक्त करणेबाबत धोरणात्मक निर्णयासाठी मा. कुलगुरूंनी खालीलप्रमाणे तीन सदस्यीय समिती गठीत करावी.**<br>**१) डॉ. प्रवीण वक्ते, प्र-कुलगुरू**<br>**२) डॉ. भालचंद्र वायकर, अधिष्ठाता, विज्ञान व अभियांत्रिकी विद्याशाखा**<br>**३) डॉ. मुरलीधर लोखंडे, अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा**<br>**सदरील समितीने आपला अहवाल व्यवस्थापन परिषदेस सादर करावा, असे सर्वानुमते ठरले.** |

| | |
|---|---|
| ४७ | विद्यापीठ निधीतून विद्यापीठ व महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी ग्रंथ प्रकाशन व विविध परिषदा/ चर्चासत्र/ कार्यशाळा प्रकल्पासाठी अनुदान वर्ष २०१९-२० वाटपासंदर्भातील प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापीठ निधीतून विद्यापीठ व महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी ग्रंथ प्रकाशन व विविध परिषदा/ चर्चासत्र/ कार्यशाळा प्रकल्पासाठी अनुदान वर्ष २०१९-२० वाटपासंदर्भातील प्रस्ताव मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.**<br>**यापुढील वर्षीपासून विद्यापीठ व महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी ग्रंथ प्रकाशन व विविध परिषदा/ चर्चासत्र/ कार्यशाळा प्रकल्पासाठी विद्यापीठ अनुदान आयोग जर अनुदान देत नसेल तर विद्यापीठ निधीतून अनुदान देण्यात येऊ नये, असे सर्वानुमते ठरले.** |
| ४८ | डॉ. आर. बी. शर्मा, प्राध्यापक, भौतिकशास्त्र विभाग यांना तत्कालीन कुलगुरूंनी १२ महिन्यांची Sabbatical Leave मंजूर केल्याचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर. |
| | **ठराव**<br>**व्यवस्थापन परिषदेची मान्यता न घेता डॉ. आर. बी. शर्मा यांना १२ महिन्यांची रजा मंजूर केल्यासंदर्भात कुलसचिवांनी सात दिवसाच्या आत मा. कुलगुरूंना खुलासा सादर करावा, असे सर्वानुमते ठरले.** |
| ४९ | इमारती व बांधकाम समितीने दिनांक ०४-०९-२०१९ रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारशीवर विचार करणेबाबत |
| | **ठराव**<br>**इमारती व बांधकाम समितीने दिनांक ०४-०९-२०१९ रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारशी मान्य करण्यात याव्यात, असे सर्वानुमते ठरले.** |
| ५० | आंतरमहाविद्यायीन क्रीडा स्पर्धेकरिता जाण्यासाठी संचालक, क्रीडा विभाग यांना कार प्रवास भाडे मिळणेबाबत प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. |
| | **ठराव**<br>**आंतरमहाविद्यायीन क्रीडा स्पर्धेकरिता जाण्यासाठी संचालक, क्रीडा विभाग यांना कार प्रवास भाडे शासन निर्णयानुसार देण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले.** |
| ५१ | डॉ. (श्रीमती) एम. टी. सावंत, सहायक प्राध्यापक, पर्यटन विभाग यांना Korea व Japan येथे जाण्यासाठी कार्यालयाची ना- हरकत प्रमाणपत्र, visa व तसेच दि. २७-०९-२०१९ ते ०१-१०-२०१९ या कालावधीत उपस्थित राहण्यासाठी Duty Leave मंजूर करण्याबाबत. |
| | **ठराव**<br>**डॉ. (श्रीमती) एम. टी. सावंत, सहायक प्राध्यापक, पर्यटन विभाग यांना Korea व Japan येथे जाण्यासाठी कार्यालयाची ना- हरकत प्रमाणपत्र, visa व तसेच दि. २७-०९-२०१९ ते ०१-१०-२०१९ या कालावधीत उपस्थित राहण्यासाठी Duty Leave मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |

**मा. कुलगुरू महोदयांच्या परवानगीने ऐनवेळेस घेतलेले विषय व संमत झालेले ठराव-**

| | |
|---|---|
| (AOB १) | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या तरतुदीनुसार जर कोणत्याही प्राधिकरणावर/ समितीवर निमंत्रित सदस्य नेमण्याची तरतूद नसेल तर असे निमंत्रित सदस्य संबंधित प्राधिकरणावर/ समितीवर नेमण्यात येऊ नयेत, असे सर्वानुमते ठरले.**<br>**जर केवळ एखाद्या प्रस्तावावर माहिती हवी असेल तर तेवढ्या प्रस्तावासाठी एखाद्या तज्ज्ञ व्यक्तीस त्या बैठकीपुरते निमंत्रित करण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले.** |
| (AOB २) | **विधी अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका ह्या इंग्रजी व मराठी भाषेमध्ये असाव्यात किंवा फक्त इंग्रजी भाषेमध्ये असाव्यात यासंदर्भात संबंधित अभ्यासमंडळाकडे विषय वर्ग करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.** |

मा. कुलसचिवांनी बैठकीस उपस्थित सन्माननीय सदस्यांचे आभार मानले. याप्रमाणे बैठकीचे कामकाज संपन्न झाले.

9.9.19

**प्रा. (डॉ.) प्रमोद येवले**
**मा. कुलगुरू- अध्यक्ष**

**श्री. दिलीप भरड**
**प्र. कुलसचिव- सदस्य सचिव**